GP-45

# अनुसूची सहा - ब

(नियम ११ - क पहा)

## भूधारकाला देण्यात यावयाच्या सनदेचा नमुना

ज्याअर्थी तालुका शिराळा गाव चरण च्या गट क्र. २३७/१ व २३७/४- क्षेत्र ३-४६ व २-२८ हे. आर चे मे. एल बी कुजीर अ पार्टनरशिप फर्म तर्फे प्रतिनिधी श्री.अमित एल कुंजीर या धारकाने त्यामधील १२२०० चौ. मी. क्षेत्रामध्ये पवनचक्की या औद्योगिक कारणासाठी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ अ च्या तरतुदी अन्वये खऱ्या खुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यास प्रारंभ केल्याची सूचना दिलेली आहे आणि इतर माहिती सादर केलेली आहे.

ज्याअर्थी, उक्त कलम ४४-अ च्या पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती लागू करण्यासंबंधी आणि त्या शर्तीची पुर्तता करण्यासंबंधी त्याने स्वत:ची खरीखुरी खात्री करुन घेतली असल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे.

आणि ज्या अर्थी वर नमूद केलेली सुचना आणि माहिती त्याच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.

आणि ज्याअर्थी, पडताळणी केल्यानंतर असे आढळून आले आहे की, उक्त कलम ४४-अ पोट कलम (१) मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या सर्व शर्ती उपरोक्त जमिनीचा धारक पूर्ण करीत आहे.

ज्याअर्थी, आता असे प्रमाणित करण्यात येत आहे की, उक्त संहितेतमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या धारकाला ही सनद देण्यात येत आहे.

(१) आकारणी - उक्त जमिनीचा धारक उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी शासनाला प्रत्येक वर्षी १ ऑगस्ट या दिवशी ३१ जुलै २०१२ रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत रु. १२२० पैसे ०० (अक्षरी र. रु. -एक हजार दोनशे वीस रुपये फक्त-मात्र) एवढी वार्षिक आकारणी आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहितेअन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशी सुधारित आकारणी देईल तसेच महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्र. एनएए/१००५/प्र.क्र.७/ल-५ दि. २३ ऑक्टोंबर ०७ अन्वये १ ऑगष्ट ०८ पासून दर वर्षी प्रती चौ.मी. १० पैसे प्रमाणे अकृषिक आकारणी त्यावरील स्थानिक उपकरासह आकारणेत यावी.

<u>आकारणीचा तपशिल खालीलप्रमाणे -</u>

| नियत (रुपये) | जिल्हा परिषद (रुपये ) | ग्राम पंचायत कर (रुपये) | एकूण (रुपये) |
|---|---|---|---|
| १२२० | ८५४० | १२२० | १०९८० |

(२) उक्त जमिनीचा धारक शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७ - अ नुसार, रुपांतरण कराची, कोणतीही असल्यास रक्कम देईल.

(३) उक्त जमिनीचा धारक उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

(४) उक्त जमिनीच्या धारकाने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, संहितेच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी अन्वये जी भरण्यास उपयोगकरता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९, पोट कलम (२) च्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीन, धारकांच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.

त्यांची साक्ष म्हणून उप विभागीय अधिकारी, वाळवा विभाग इस्लामपूर यांनी या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावलेली आहे आणि अर्जदारानेसुध्दा २१/१०/२०१२ रोजी त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

(अ) सही ------------------------------

नांव श्री. ---------------------------

मे. एल बी कुजीर अ पार्टनरशिप फर्म तर्फे प्रतिनिधी
श्री.अमित एल कुंजीर

(ब) सही ------------------------------

नांव श्री. ---------------------------

(उप विभागीय अधिकारी यांची माहोर)

उप विभागीय अधिकारी
वाळवा विभाग इस्लामपूर

आम्ही जाहीर करतो की, जिने या सनदेवर स्वत: अमुक अमुक म्हणून स्वाक्षरी केलेली आहे ती, अ, ब ही व्यक्ती, तीच आहे आणि तिने या ठिकाणी आमच्या समक्ष तिची स्वाक्षरी केलेली आहे.

क्र/बिनशेती/औदयो.सनद/एसआर/ ९८ /२०१२
उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय
वाळवा विभाग इस्लामपूर
दिनांक -२४/१०/२०१२

उप विभागीय अधिकारी
वाळवा विभाग इस्लामपूर

प्रति,

१) मे. एल बी कुजीर अ पार्टनरशिप फर्म तर्फे प्रतिनिधी श्री.अमित एल कुंजीर-सर्व्हे नं. ५२/१ , श्रीराम सोसायटी, स्वानंद इमारत, महेंद्रा शोरुमजवळ पुणे नगर रोड चंदननगर पुणे

२) तहसिलदार -शिराळा- यांना माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

३) गां. का. तलाठी -चरण-, ता.-शिराळा- यांना माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

४) मा. जिल्हाधिकारीसाो, सांगली (महसूल शाखा) यांना माहितीसाठी सविनय सादर.